agriculture I-AGRI is my passion
Powered by KRISHITHON

# संवाद युवकांचा निश्चय प्रगतीचा

## युवा कृषी सन्मान व संवाद

**प्रयोगशील युवा कृषी सन्मान व संमेलन**

**23 - 27 नोव्हें 2023**

स्थळ : कृषीथॉन, ठक्कर डोम, एबीबी सर्कल जवळ, नाशिक.

- पुरस्कर्ता -
Krishithon® कृषीथॉन

- आयोजक -
HSF Human Service Foundation
A Regd. Trust
MEDIA® EXHIBITORS PVT. LTD.

- संकल्पना -
YOUTH IN AGRICULTURE

# युवकांचे कृषि क्षेत्रातील महत्व अधोरेखीत करणारा उपक्रम !




**पद्मविभुषण मा. शरद पवार**
माजी कृषी मंत्री, भारत सरकार




**मा. राजेंद्र सिंह – जलपुरुष**
मॅगेसेस अॅवॉर्ड विजेता



**मा. ज्ञानेश्वर बोडके**
अभिनव फार्मस् क्लब



**पद्मश्री मा. सुभाष पाळेकर – प्रवर्तक, झीरो बजेट नॅचरल फार्मिंग**

## प्रयोगशील युवा कृषी सन्मान व संमेलन : २०२३

भारतीय कृषी क्षेत्रास सातत्याने वेग–वेगळ्या गंभीर समस्या भेडसावित आहेत. बदलत्या हवामानासोबत मानव निर्मित समस्यांचा देखील विळखा या क्षेत्रास पडला आहे. एका बाजूस वाढत्या जनसंख्येस अन्न पुरविण्याचे आव्हान आणि दुसऱ्या बाजूस शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा भाव यातील तफावत यामुळे ग्रामीण भागातील युवक शेती व्यवसाय सोडून शहराकडे स्थलांतरित होत आहे. अशा समयी गरज आहे ती कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले शेतकरी, कृषी संशोधक, उद्योजक आणि कृषी विभागात विस्ताराचे कार्य करणाऱ्या प्रयोगशील युवकांच्या माध्यमातून या समस्यांवर उत्तर शोधण्याची आणि त्यांच्या कार्याच्या गौरवाची.

कृषीथॉन या प्रदर्शनाच्या माध्यमातून सन १९९८ पासून युवकांचा शेतीतील सहभाग या विषयावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या माध्यमातून विचारांच्या देवाण – घेवाणासोबत नवनवीन तंत्रज्ञानासोबत युवक जोडला गेला आहे. याची प्रचिती नाशिक जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा विकास इतर जिल्ह्याच्या तुलनेत बघितल्यावर लक्षात येते, याचे मुख्य श्रेय जाते ते युवकांनी तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा वापर केल्याच्या कार्यास.

### बदल घडविणारे व्यासपीठ

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून ३५० युवा जे कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकरी, शास्त्रज्ञ आणि कृषी उद्योजक. ज्यांनी 'कृषी विकासाचे ध्येय' गाठण्याचे स्वप्न उराशी बाळगले आहे. अशा युवकांच्या विचारांची देवाण – घेवाण.

### कृषी क्षेत्रातील कार्यसम्राटांकडून मार्गदर्शन

आपल्या कार्याने ज्यांनी कृषी क्षेत्रास नवीन संकल्पना, कृषी क्षेत्राचे संवर्धन किंवा ग्रामिण भागात रोजगार निर्मिती करवून दिली. अशा प्रतिभावंत कार्य सम्राटांद्वारे मार्गदर्शन व शंका निराकरण.

# आमच्या कौशल्याने बहरेल कृषिक्षेत्राचे रूप !








कृषीथॉन युवा सन्मान दरम्यान आपले विचार व्यक्त करतांना युवा.



## कार्याचा गौरव

संमेलनात सहभागी झालेल्या प्रयोगशील युवकांच्या कार्याचा गौरव. यात खालील श्रेणीत कार्यरत असलेल्या युवकांची निवड करण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रयोगशील युवा शेतकरी**<br>पुरुष / महिला | **प्रयोगशील**<br>**युवा कृषी संशोधक** | **प्रयोगशील**<br>**युवा कृषी उद्योजक** | **प्रयोगशील गुणवंत**<br>**कृषी विद्यार्थी** |

## कृषी तंत्रज्ञान विस्तार कार्यात प्रयोगशीलता दर्शविणारे खालील श्रेणीतील युवा

| | | | |
|---|---|---|---|
| **कृषी विभाग** | **सामाजिक संस्था** | **कृषी विद्यापीठ** | **कृषी विज्ञान केंद्र** |

## कृषीथॉन युवा सन्मान पुरस्कारासाठी पात्रता

१) अर्जदार हा भारतीय नागरिक असावा.
२) अर्जदार २५ ते ३५ या वयोगटातील असावा.

- नामांकनासाठी अंतिम दि. ३० सप्टेंबर २०२३

३) अर्जदाराने पुरस्कारासाठी असलेल्या फॉर्ममध्ये संपुर्ण माहिती भरून देणे अनिवार्य आहे. अपूर्ण माहिती असल्यास प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.



## आयोजक : ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन, नाशिक

ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था असून, सन १९९८ पासून समाजातील विविध घटकांना एकाच उद्देशाने एकत्रित आणून कृषी, सामाजिक स्वास्थ्य, बाल व महिला हक्क यांसारख्या विविध विषयांवर कार्य करीत आहे. संस्थेतर्फे भरविले जाणारे 'कृषीथॉन' हे आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन असंख्य शेतकरी, कृषी व्यावसायिक, कृषी संशोधक आणि अभ्यासकांसह कृषी क्षेत्राशी निगडित नागरिकांचे हक्काचे व्यासपीठ बनले आहे. या प्रदर्शनात आयोजित परिसंवाद, चर्चा सत्र, कार्यशाळा हे उपक्रम शेतकरी आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये नवसृजनाची बीजे रोवून त्यांना प्रेरित करीत आहेत. ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून शेतीत करिअर करू इच्छिणाऱ्या युवकांना मार्गदर्शन करून त्यांना करिअरच्या संधी देखील उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात अनेकांसाठी ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन प्रेरणास्रोत म्हणून पुढे आले आहे.

# कृषी विकासासाठी कटीबध्द - चला करूया कृषी समृध्द !



**मा.श्री. एकनाथ डवले**
ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य



**पद्मश्री. राही बाई पोपरे** - बीज माता आणि
**श्री सूरज मांढरे** - आयएएस




**मा.श्री. विश्वास नांगरे पाटील**
पोलिस आयुक्त, नाशिक.



**मा.श्री. मकरंद अनासपुरे**
अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते





**साहील न्याहारकर**
आयोजक - कृषीथॉन

## आयोजक शहर : नाशिक

नाशिक शहरात कृषीथॉनच्या माध्यमातून युवा सन्मान व संमेलनाचे आयोजन करतांना अभिमान वाटत आहे. नाशिक शहराभोवती वसलेले सह्याद्री डोंगरांचे निसर्ग सौंदर्य, सुखकारक व आल्हाददायक हवामान हे शहराच्या सौंदर्यात अधिकच भर घालते. महाराष्ट्रातील या जिल्ह्याने कृषी क्षेत्राशी निगडित आपले विशेष योगदान दिले आहे. या योगदानाच्या बळावर नाशिक शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला विशेष ठसा उमटविण्यात यशस्वी होतांना दिसत आहे. नाशिक परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते व ही भूमी कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाची कर्मभूमी म्हणूनही आपले नाव जगभरात अधोरेखित करीत आहे. संपूर्ण भारतातून नाशिक जिल्ह्याचा कृषी योगदानात प्रथम क्रमांक लागतो. नाशिकमध्ये उत्कृष्ट दर्जाची द्राक्षे, कांदा व डाळिंबाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या फळांसाठी नाशिकला निर्यातदार म्हणून सुध्दा ओळखले जाते. त्याच प्रमाणे ताजा भाजीपाला सुध्दा येथे विपुल प्रमाणात तयार होतो. याशिवाय नाशिकमधून संपूर्ण भारतभर सहज वाहतूक होते हे विशेष.

Krishithon® कृषीथॉन

**भारतातील अग्रगण्य कृषी प्रदर्शन**
**23rd - 27th नोव्हें. 2023**
**नाशिक, महाराष्ट्र, भारत**

**नामांकन अर्ज आणि नोंदणी विषयी अधिक माहितीसाठी संपर्क करा.**
**निखिल - पुरस्कार समन्वयक, मो.नं. 9175094569**

**सूचना :** तुम्ही नामांकनासाठी अर्ज पाठविला म्हणजे तुमची अंतिम निवड झाली असे नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

HSF Human Service Foundation
A Regd. Trust
MEDIA® EXHIBITORS PVT. LTD.
**मिडीया हाऊस** - आनंदी नगर, आनंदवल्ली जवळ, गंगापूर रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत - ४२२०१३ | ई मेल : krishi.nashik@gmail.com

Krishithon®
कृषीथॉन

# गुणवंत कृषी विद्यार्थी पुरस्कार २०२३

## नामांकन अर्ज

प्रति,
मा.संयोजक,
गुणवंत कृषी विद्यार्थी पुरस्कार समिती - २०२३
**ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन**
मिडीया हाऊस, वृंदावन लॉन्स समोर, आनंदी नगर, आनंदवल्ली, गंगापूर रोड, नाशिक. (महाराष्ट्र) - ४२२ ०१३.
फोन : ०२५३ - २९७०१२१ / २२ / २३. ई-मेल : info@mediaexhibitors.com / crm@mediaexhibitors.com

महोदय,
गुणवंत कृषी विद्यार्थी पुरस्कार - २०२३ साठी कृषी महाविद्यालय स्तरावरील अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या खालील विद्यार्थ्याचा प्रस्ताव शिफारशीसह सदर पुरस्कारासाठी पाठवित आहोत.

**वैयक्तिक माहिती :**

विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव : ____________________

विद्यार्थ्याचा मुळ पत्ता : ____________________

जिल्हा : ____________ राज्य : ____________ पिनकोड : ☐☐☐☐☐☐

जन्म ता. : ☐☐☐☐☐☐☐☐ संपर्क : मो. : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई-मेल : ☐

**विद्यार्थ्याची शैक्षणिक माहिती :**

| अ.क्र. | शिक्षण | बोर्ड / विद्यापीठ | प्राप्त टक्के / श्रेणी |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |

**विद्यार्थ्याद्वारे भरावयाची वैयक्तीक माहिती :**

- आपले कुटुंब शेती व्यवसायावर निर्भर आहे का? १००% ☐ अंशत: ☐ नाही ☐
- आपल्या कुटुंबातील सदस्यांपैकी कृषी शिक्षण प्राप्त केलेले सदस्य आहेत का? हो ☐ नाही ☐
- कृषी क्षेत्र निवडण्यामागील आपली भुमिका - (विस्तारीत स्वरुपात लिहावे आवश्यकता असल्यास पुरवणी जोडावी) ____________________
- कृषी विद्यालय / महाविद्यालयात शिक्षण घेत असतांनाचे विशेष प्राविण्य :
- कृषी विस्ताराशी निगडीत उपक्रमातील सहभाग :

**नियम व अटी :** १) प्रस्तावासोबत विद्यार्थ्यास प्राप्त प्रशस्तीपत्रे, प्रमाणपत्रे, वृत्तपत्रातील कात्रणे यांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. २) पाठविलेली माहिती खरी असावी. ती खोटी आढळल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल. ३)काही अपरिहार्य कारणास्तव पुरस्काराचे नियोजन कुठलीही पूर्व कल्पना न देता पुढे ढकलण्यात किंवा रद्द करण्यात येऊ शकते. ४) पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यास आपल्या मुळ गावापासून/महाविद्यालयापासून ते पुरस्कार वितरणाचे शहर नाशिक येथेपर्यंत येण्याचे फक्त राज्य परिवहन मंडळ बस तिकटाचे किंवा भारतीय रेल्वे द्वितीय श्रेणी स्लीपरच्या येण्याजाण्याचा खर्च आयोजकांमार्फत अदा करण्यात येईल. ५) पुरस्काराचे स्वरूप हे विद्यार्थ्यांकरीता सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र हे असणार आहे.
* सर्व हक्क संयोजकांकडे राखीव. अटी व शर्ती लागू.

स्वाक्षरी - **विद्यार्थी**

स्वाक्षरी - **प्राचार्य**
कॉलेजचा शिक्का

स्वाक्षरी - **संपर्क अधिकारी**
मो./ फोन ____________